# प्रकरण चौथे

# 'जंगलाचं देणं' या ललित गद्यसंग्रहातून प्रतिबिंबीत होणारी लेखकाची चिंतनशीलता

## प्रकरण चौथे

# 'जंगलाचं देणं' या ललित गद्यसंग्रहातून प्रतिबिंबीत होणारी लेखकाची चिंतनशीलता

ललित साहित्यामधून लेखकाचे व्यक्तित्व प्रकट होत असते. लेखकाच्या आचार विचारांचे दर्शन साहित्यामधून घडते. म. मा. आळतेकर म्हणतात, "ललित निबंधाचा (निबंधाचा नव्हे) विषय कोणताही असला तरी लिहिणारा लेखक हाच त्याचा खरा विषय असतो."[१] लेखकाचे सारे अंतरंग न कळत ललित साहित्यातून प्रकट होतात. वि. स. खांडेकर म्हणतात, "ललित निबंधाचें मुख्य कार्य विषयाच्या अनुषंगाने लेखकाच्या व व्यक्तित्वाची, त्यांच्या स्वभावाची, त्यांच्या आवडीनिवडीची ओळख वाचकाला झाली पाहिजे. ..सुहृद्भाव हा त्याचा आत्मा होय... हॅम्लेटच्या वेडातही पद्धती होती त्याप्रमाणे ललित निबंधाच्या विस्कळीतपणातही लेखकाची योजकता आणि कल्पकता असावी लागते."[२] 'जंगलाचं देणं' या ललित गद्यसंग्रहामध्ये जे सत्तावीस लघुनिबंध आहेत. त्यावरून चितमपल्लींच्या चिंतनशीलतेची वाचकाला जाणीव होते. म. द. हातकणंगलेकर यांनी चितमपल्ली यांच्याबद्दल म्हटले आहे की, "मनाच्या गुंफेत वनविद्येचे चिंतन करणारा जंगल अधिकारी."[३] हातकणंगलेकरांचे मत चितमपल्लींना शब्दशः लागू पडते. जंगल हा निसर्गाचा मुख्य घटक आहे. तेव्हा आजची वाढती जंगलतोड पाहून चितमपल्ली या निसर्गप्रेमी लेखकाला त्यांची काळजी वाटते. जंगलाचे संरक्षण झाले पाहिजे. आपल्या भावी पिढीतही जंगले वाचली पाहिजेत. कारण ही जंगले राहिली तर पशूपक्षी, प्राणी, झाडे, झुडुपं आणि जंगलाच्या आजुबाजूला राहणाऱ्या आदिवासींचे रक्षण होणार आहे. याची चिंता चितमपल्लींना आहे. 'दादा गोरे' म्हणतात, "एखाद्या झाडावरचा अगर पक्ष्यावरचा लेख चितमपल्ली यांच्या सूक्ष्म निरीक्षणातून उभा राहिलेला दिसतो. 'जंगलाचं देणं' यात असंच चिंतन आलेलं आहे."[४]

जंगलापासून दुरावलेल्या शहरी माणसांना जंगल संपत्तीची माहिती करून देणे त्यांना जंगलाच्या संपर्कात आणणे हा चितमपल्लींच्या लेखनाचा हेतू आहे. 'जसा लेखक तसे त्याचे लेखन.' या उक्तीप्रमाणे चिमतपल्लींच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम त्यांच्या लेखनावर झाला आहे. चितमपल्लींना बालपणापासून निसर्गाची ओढ आहे. जंगलावर

लेखकाचे नितांत प्रेम आहे. जंगलाचे संवर्धन व्हावे असे त्यांना मनोमन वाटते. चितमपल्लींना वनसंरक्षाणची चिंता आहे त्यामुळेच त्यांनी वनातील जीवांच्या जीवनाचे चित्रण केले आहे.

## १. वन्यजीवनाचे यथार्थ चित्रण :–

चितमपल्लींचे जंगलात सतत वास्तव्य असल्याने आणि जंगल भागात राहिले असल्याने त्यांना वन्य जीवनाचे जवळून निरीक्षण करता आले. चितमपल्ली म्हणतात, "माझ्या व्यवसायामुळं मला जंगल भागात आड मार्गावर राहावं लागे."[५] चितमपल्लींना वनजीवनाचे भरपूर ज्ञान आहे. याविषयी चितमपल्ली म्हणतात, "वनजीवनाविषयी जे ज्ञान प्राप्त होते ते निरीक्षण आणि त्यांच्या जीवनक्रमाविषयी अनुभव घेतल्यामुळेच जंगलातील अहोरात्र वास्तव्य आणि संवेदनशील मनामुळं मला ते सहज प्राप्त झालं."[६] चितमपल्लींचे मन संवेदनशील आहे याची प्रचिती त्यांच्या लेखनातून वारंवार येत राहते. जंगल हे वन्य जीवांचे जग आहे जंगलामध्ये अगदी कीटकांपासून ते आदिवासींपर्यंत अनेक जीव जगत असतात. वन्यजीवनाचे चित्रण करताना लेखकाने बऱ्याच ठिकाणी पशु–पक्ष्यांच्या जीवनाचा वेध घेतलेला आढळतो. त्यांच्या जीवनातील भावप्रसंग, सुख–दुःखे टिपलेली आहेत. त्याचबरोबर जंगलात राहणाऱ्या आदिवासी जीवनाचाही उलगडा या पुस्तकामध्ये केलेला आहे.

### आदिवासी स्त्रियांचे जीवन :–

आदिवासी स्त्रिया दिसायला खूप सुंदर असतात. चितमपल्ली म्हणतात राधेच्या कुळातील म्हणून की काय? या स्त्रिया खूप सुंदर दिसतात. चेहऱ्यावर तेज असतं, लांबसडक केसांचा उंच खोपा डोक्यावर असतो. सौंदर्याची ही देणगी त्यांना निसर्गानेच बहाल केलेली असणार.

### आदिवासी स्त्रियांची अगतिकता :–

आदिवासी स्त्रियांच्या जीवनातील वेगळेपण इथे दिसून येते. इतर स्त्रियांपेक्षा आदिवासी स्त्रियांचे जीवन किती कष्टमय आहे याची अनुभूती येते. आदिवासी स्त्रियांना आंघोळीसाठी शहरी स्त्रियांसारखी बाथरुमं वगैरे नाहीत. त्या उघड्यावर ओढ्यानद्यांमध्ये

किंवा जंगलाच्या आजूबाजूला असणाऱ्या पाण्याच्या डोहामध्ये आंघोळ करतात. नाहीतर जंगलासारख्या ठिकाणी बांधीव विटा–मातीची बाथरुम आणायची, कुठून? शेवटी लज्जा ही प्रत्येकालाच असते म्हणून तर त्या स्त्रिया गाडीचा आवाज ऐकताच पटकन पाण्यात उड्या मारायच्या. या आदिवासी स्त्रिया निसर्गाप्रमाणेच मोकळ्या मनाने जगत आहेत. तसं पाहिलं तर या स्त्रियांची सामाजिक परिस्थिती हालाखीची आहे. दिवसभर पोटासाठी अन्न शोधत रानावनामध्ये भटकावे लागते. स्वयंपाकासाठी वनात पडलेल्या लाकडाच्या मोळ्या गोळा कराव्या लागतात. या मोळयांची ओझी डोक्यावर घेऊन कितीतरी लांब चालत यावे लागते. अशा परिस्थितीत या स्त्रिया वाट्याला आलेले जीवन जगत असताना नेहमी आनंदी असतात. कधीही कसलीही तकार या स्त्रिया करीत नाहीत. स्वतःच्या अगतिकतेची जाणीव होऊनसुद्धा सामाजिक बांधिलकीमुळे त्या स्त्रिया आनंदाने सगळं सहन करतात. यावरून आदिवासी स्त्रियांच्या जीवनातील वेगळेपण आणि त्यांचे कष्टमय जीवन दिसून येते. आदिवासी स्त्रियांनीच चितमपल्लींना 'देवभाता'चे रहस्य सांगितले. यावरून असे प्रत्ययास येते की, या स्त्रियांमध्ये काही समज गैरसमज आहेत. तरीही जंगलातील वृक्षवेलींवर, झाडाझुडुपांवर त्यांची मनापासून श्रद्धा आहे, प्रेम आहे.

## आदिवासी पुरूषांचे जीवन :–

आदिवासी स्त्रिया जशा कष्टमय जीवन जगतात त्याचप्रमाणेच तिथले पुरूषही रात्रंदिवस कष्ट करतात. उदा. :– तिथले धीवर मासे पकडण्यासाठी रात्र–रात्र जलाशयामध्ये जाळी लावून जलाशयाकाठी बसलेले असतात. त्यांना कसलीही भीती नाही. रात्रीच्या अंधारात वन्य प्राणी आपल्यावर हल्ला करतील याची ते धीवर तमा बाळगत नाहीत कारण हे मासे पकडल्याशिवाय त्यांची उपजीविका चालणार नाही. त्यांना हे मासे पकडण्याशिवाय पर्याय नसतो. तेव्हा त्यांचे सारे लक्ष जलाशयातील माशांकडे असते. पोटासाठी मरणाची काळजी ते करत नाहीत. आपल्याला जसे आपल्या भागातील आसपासच्या गावांची माहिती असते तसे या आदिवासींना कोहळी लोकांना जंगलाची आणि जंगलातील पशु, पक्षी, प्राण्यांची पुरेपूर माहिती असते. या माहितीचा चितमपल्लींना भरपूर उपयोग झाला. आदिवासी माणसांचे, त्यांच्या स्वभावाचे लखलखीत पैलू चितमपल्ली यांनी विलक्षण सामर्थ्याने आणि कलात्मक स्वरूपात मांडले आहेत. आदिवासी माणसं निसर्गाच्या लहरीवर

नियंत्रण ठेवून जगतात. आदिवासींकडून चितमपल्लींना भरपूर असे ज्ञान मिळाले कारण जंगलात सतत राहिल्यामुळे आदिवासींना आजूबाजूच्या परिसराच्या नैसर्गिक इतिहासाचे ज्ञान असते. चितमपल्लींनी जिज्ञासू वृत्तीने आदिवासींकडून भरपूर ज्ञान मिळवले. निसर्गाच्या देण्यावर आदिवासी माणसं समाधान मानतात. शहरी माणसांप्रमाणे आदिवासींकडे टी.व्ही., टेप, रेडिओ, कपाटे, फ्रीज असल्या वस्तू नाहीत. उंच उंच बंगले नाहीत. मनोरंजनाची कोणतीही साधने नाहीत. परिस्थिती गरिबीची आहे तरीही आदिवासी माणसं आनंदाने जगत असतात. पैशाच्या मागे ती लागत नाहीत. त्यांना उद्याची काळजी नसते. रोजच्यारोज पोटासाठी अन्न शोधत ती माणसं भटकत असतात. इतर मानवांप्रमाणे अन्नाचा साठा करून ठेवत नाहीत. धनाचा संचय करत नाहीत. चितमपल्ली मुलाखतीमध्ये सांगतात, "ही आदिवासी माणसं रोजच्या रोज अन्न गोळा करून खातात. कशाचाही ते साठा करून ठेवत नाहीत. नाहीतर आपल्याकडील मानव मात्र सातपिढयांचं धन साठवून ठेवतो."[७] निसर्गातील घडामोडींवरून त्यांना वेळेचं भान होतं.

चितमपल्ली म्हणतात, "जंगलात राहणारे आदिवासी चांदण्यावरून वेळ मोजतात. शीतकाळात दिवस बुडतीकडे रात्री आठ नऊच्या दरम्यान 'जेवण चांदणी' दिसू लागते. निरगू ती चांदणी बुडण्याअगोअर दोन घास खाऊन घ्यायचा. शुकीर चांदणी उगवली की तो झोपेतून जागा व्हायचा."[८] अशी ही आदिवासी माणसं गरिबी असली तरी निसर्गाच्या सहवासात रमून जातात.

## आदिवासींमध्ये असणाऱ्या काही जुन्या समंजुती :–

जंगलाशिवाय बाह्य जगाचे व्यवहार ज्ञान नसल्याने आणि शिक्षणाचा अभाव यामुळे आदिवासी लोकांमध्ये काही वेळेस अंधश्रद्धेचे प्रमाणही आढळून येते. उदाः– टिटवीचे ओरडणे, घुबडाचे दर्शन, एवढंच नव्हे तर बांबूला फुलोरा येणे हे सुद्धा आदिवासी अशुभ मानतात कारण ते दुष्काळाचं प्रतीक आहे असं ते समजतात. शास्त्रीय ज्ञान त्यांच्याकडे नाही. नैसर्गिक जीवनातच ही माणसं समाधानी असतात.

चितमपल्ली म्हणतात, "आलमेलकरांना मुंबईच्या जीवनात सत्य कुठंच दिसत नसे. तिथलं सारं जीवन कृत्रिम, म्हणून खरं सत्याचं जीवन कुठं असेल तर ते भारतात फक्त त्यांना आदिवासींच्या जीवनात दिसून येईल."[९] चितमपल्लींनी वन्य भागात राहणाऱ्या आदिवासी जीवनाचे चित्रण केले आहे. डॉ. सुहास पुजारी म्हणतात, "चितमपल्ली यांचे लेखन हे निसर्गानुभवावर आधारलेले असले तरी मानवी जीवन-दर्शनाच्या बाबतीतही तितकेच महत्त्वाचे आहे."[१०] माणूस आणि निसर्ग यांच्यातील अनुबंध चितमपल्लींनी व्यक्त केला आहे. चितमपल्लींनी वनात आढळणारे पशुपक्षी प्राणी झाडेझुडुपे यांचे मानवी जीवनाप्रमाणे चित्रण केल्याचे आढळते. झाडाझुडुपांनी वृक्ष वेलींनी सारी धरती सजली जाते. ही हिरवळ जर धरतीवर नसती तर धरती उजाड वाटली असती. त्यामुळे असे वाटते की, वृक्षच या धरतीला शोभा आणतात. तेव्हा हे वृक्ष कसे वाढत जातात. आपल्या सख्यासोबत्यांबरोबर कसे जीवन जगतात हे चितमपल्लींच्या लेखनावरून दिसून येते. ही झाडे कुठे एकटी दुकटी वाढतात. तर कुठे समूहाने वाढत असतात. स्वतःचा आकार ती मुक्तपणे शोधीत असतात. परंतु हा आकार शोधताना त्यांना शेजारी असणाऱ्या झाडांचं भान ठेवावं लागतं कारण या झाडांमध्येही नातीगोती मित्र मैत्रिणी असतात त्यामुळेच वाढणाऱ्या झाडांना आजूबाजूच्या परिस्थितीची जाणीव ठेवावी लागते. ही झाडे सख्या–सोबत्यांना जवळ करतात आणि परक्यांना दूर सारतात. जंगलात जिथं गुरं सतत चरत असतात तिथं पुन्हा झाडं उगवत नाहीत. लेखक त्याला वांझ झालेली मैदानं म्हणतात. जंगलात वाढणाऱ्या पळसाचे जीवन मात्र मजेदार आहे. एरव्ही पळस हा वृक्ष अनाकर्षक समजला जातो त्याच्याकडे कुणी पाहातही नाही, परंतु चैत्रात जेव्हा पळस भरून येतो तेव्हा त्याचं सौंदर्य पाहण्यासारखं असतं. वनातील जमीन निकस व्हायला लागली की, पळसाचं प्रमाण वाढतं. पळसाच्या फुलात भरपूर मध असतो तो मध खाण्यासाठी अनेक पळसमैना विविध प्रकारचे पक्षी या झाडांकडे आपोआप आकर्षित होतात. तसेच मोहाचे वृक्ष फुलांनी बहरू लागले की, आदिवासींना वैशाख वणव्याची चाहूल लागते. ती मोहाची फुलं म्हणजे वन्य जीवाचे ते अन्नच आहे.

चितमपल्लींनी अनेक पक्षी प्राण्यांच्या जीवन कथा चित्रित केलेल्या आहेत. उदाः– जंगलात आढळणारा महत्त्वाचा प्रदेश म्हणजे झिलानी. अनेक प्राणी पक्ष्यांना या झिलानीत निवारा मिळतो तिथल्या देवभातामुळे या झिलानीत राहणाऱ्या पक्ष्यांची अन्नाची

गरज भागते. टिबुकली या पक्ष्याच्या सुखी कुटुंबाचे भावमय जीवन चितमपल्लींनी चित्रित केले आहे. हे चित्रण वाचकाला प्रभावित करते. पक्षाच्या सहजीवनाची ओळख होते. पक्षी आपले कुटुंब किती प्रेमाने सांभाळतात याचे वर्णन लेखकाच्या चिंतनशीलतेतून उतरले आहे.

'पक्षीगान' लघुनिबंध वाचून याची जाणीव होते. अशी ही पक्ष्यांच्या रंगरूपातील विविधता आपल्या मनात रंगाची उधळण करते. वीणीचा काळ हा पक्ष्यांच्या प्राण्यांच्या जीवनातील आनंदाचा काळ असतो. या काळात हे पशू–पक्षी आनंदाने देखणी अशी घरटी बांधतात. या पक्ष्यांच्या आणि प्राण्यांच्या जीवनातील नाजूक भावप्रसंगही चितमपल्लींनी टिपले आहेत. 'ललितरंग' या ग्रंथाचे लेखक म्हणतात, "प्राण्यांच्या लकबी, सवयी, त्यांचा घरटी विणण्याचा काळ, पिलांना चारा भरविणे, ऊब देणे, त्यांच्या सवयी, त्यांच्या वृत्ती, त्यांचे सहजीवन यातून चितमपल्लींनी जे निरीक्षण केले आहे ते वाचले की, प्राणी जीवनालाही एक अर्थ आहे हे समजते."[११] सहजीवन सुखी होण्यासाठी प्रेमाची नितांत आवश्यकता आहे हे लेखकाचे चिंतन येथे प्रगट होते.

या पक्षी–प्राण्यांच्या जीवनात विणीचा काळ हा समृध्दीचा, सौंदर्याचा मानला जातो. कारण त्या पक्षी–प्राण्यांची गूढतम चारूता त्यांच्या प्रसवकाळात गूढ आचरण्याच्या पडद्याआडून घरट्याच्या रूपाने डोकावत असते. घारी–गिधाडांसारखे काही पक्षी–प्राणी सोडले तर प्रत्येक पक्षी आणि प्राण्याला घरटी बांधण्याचा छंदच असतो. त्या घरट्यात आपली पिलं ठेवून अन्न शोधायला निघून जातात आणि चारा मिळाला की तो चोचीत घेऊन आपल्या पिलांच्या ओढीनं घराकडे लगबगीने येत असतात. ही घरटी म्हणजे त्या पिलाचं संरक्षण होण्याचं एकमेव ठिकाण आहे. त्यामुळे तर पक्षी, प्राणी आपली पिलं घरट्यात ठेवून निष्काळजीपणे अन्न शोधायला निघून जातात. वन्यजीवनाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य चितमपल्ली सांगतात, "माणसाप्रमाणे हे पक्षी प्राणी आपली पिले जन्मभर सांभाळत नाहीत. पिलांना जन्म दिला, त्यांना वाढविले पंख फुटून त्यांनी घरटे सोडले की, त्यांचा त्याग करतात. एकाच घरट्यात वाढलेल्या भावंडांची कायमची ताटातूट होते कर्तव्य करावं, परंतु फळाची आशा धरू नये ही उक्ती हे वन्यजीव शिकवतात. तसेच उद्याची काळजी त्यांना नसते."[१२] यावरून असे दिसून येते की,

कर्मण्येव, अधिकारस्ते
मा फलेषु कदाचन।।

हे तत्त्वच जणू पक्ष्यांनी आत्मसात केलेले असते आपल्या चिंतनातून चितमपल्लींनी पक्ष्यांच्या वर्तनाचे बारकावे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'जंगलाचं देणं' या पुस्तकामधून चितमपल्लीं वन्यप्राण्यांच्या जीवनाचे दर्शन घडवितात. गिधाडे कळपाने पहाडांच्या कडेकपारीला घरटी बांधून राहतात. मान लांब करून एकमेकांचा पाठलाग करीत जंगलात आनंदाने पळत असतात. नंतर जंगलात 'साप' हा प्राणी विलक्षण आवाज काढतो. जंगलाच्या कडेने ठिकठिकाणी वारूळे असतात. असे प्राण्यांच्या जीवनाचे दर्शन घडविताना चितमपल्लीनी त्या प्राण्यांचे देखणेपण, त्यांच्या हालचाली, त्यांचे आवाज, त्यांची समूहनिष्ठा, कळपनिष्ठा आणि सत्तासंघर्ष, तसेच त्यांची निसर्गसुलभ वृत्ती, संरक्षण करण्याची त्यांची पद्धती असे प्राणीजीवनातले विशेष टिपले आहेत. त्यावरून आपल्याला प्राण्यांच्या वन्य जीवानाची अनुभूती येते.

ललित रंग या ग्रंथाचे लेखक म्हणतात, "चितमपल्लींनी, प्राणी आपली घरे कशी करतात, अन्नाचे दुर्भिक्ष्य असताना प्राणी आपले अन्न कसे साठवून ठेवतात. हे सगळे निरीक्षणातून मांडले आहे. ते वाचताना आपण थक्क होतो."[१३] सर्वसामान्यांच्या अनुभव कक्षेत न येणाऱ्या वन्यजीवाचे चित्रण चितमपल्लींनी प्राचुर्याने केले आहे. डॉ. सुहास पुजारी यांच्या मते, "आपल्या प्रदीर्घ अशा वनजीवनात नानाविध स्वरूपाचे जे वन्यजीव चितमपल्ली यांनी पाहिले त्यांची त्यांनी निरीक्षणे केली, शोध घेतला आणि या विलक्षण जगाची ओळख त्यांनी आपल्या लेखनाद्वारे करुन दिली."[१४]

न हि ज्ञानेन सदृश्यं पवित्रमिह विद्यते।

---

ज्ञानासारखे दुसरे पवित्र काही नाही. नवीन ज्ञान प्राप्त करून लेखकाने लेखन केल्याने ते अधिकच मर्मग्राही व परिणामकारक झाल्याचे दिसते. ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा आहे. **Knowledge is vertue.** चितमपल्लींनी हे जे लेखन केले आहे त्यातून त्यांचे चिंतन प्रगट झाले आहे. चिंतनशीलतेमुळे लेखनात सच्चाई गहिरेपणा आला आहे. 'जंगलाचं देणं' हा निबंधसंग्रह वाचनीय झाला आहे.

## २. आधुनिक कालखंडात वनांच्या रक्षणासाठी आलेले सामाजिक भान :-

आज 'वाढती जंगलतोड' हा चिंतेचा विषय बनलेला आहे. या अशा मोठ्या चिंतेच्या विषयाचा विचार चितमपल्लींनी केलेला आहे. असे 'जंगलाचं देणं' या पुस्तकावरुन प्रत्ययास येते.

प्रवीण बर्दापूरकर म्हणतात की, "सुमारे चार दशकांपूर्वी जंगल आणि जंगलाचे भावजीवन शब्दबद्ध करण्याचा मारुती चितमपल्लींनी घेतलेला घ्यास आजही तेवढ्याच तीव्रतेने कायम आहे."[१७] आज सरकारने वृक्षतोडीवर बंदी घातलेली आहे. तरीही माणसं स्वतःच्या सुखासाठी या वृक्षांची हत्या करतच आहेत. बिनधास्तपणे वने, उध्वस्त करत आहेत. अशा परिस्थितीत चितमपल्लीनी वनांचे, झाडांचे महत्व पटवून देऊन लोकांच्याही मनात जंगलाविषयी आपुलकी निर्माण केली आहे. आधुनिक कालखंडात जर वनांचे रक्षण केले नाही. तर पुढच्या भावी पिढीला ते तापदायक ठरणार आहे. आपण त्यांच्यावर जसे संस्कार करू तशीच ती पिढी उपजणार. त्यासाठी प्रथम आपणच त्यांच्यावर चांगले संस्कार केले पाहिजेत. आपल्या पूर्वजांनी जे आपल्यासाठी राखून ठेवलय् ते जतन केलं पाहिजे. त्याचं रक्षण केलं पाहिजे. जंगल ही निसर्गाची अनुपम देणगी आहे. निसर्गाने ती आपल्या सर्वांना बहाल केली आहे. असे चांगले संस्कार जर आपण आपल्या मुलांवर केले तर ती मुलंसुद्धा विचारी बनतील त्यांना समजून सांगितले पाहिजे की, निसर्ग हा आपला जवळचा नातलग आहे आणि आपल्या नातेवाईकाचं रक्षण करणे हे आपलं आद्यकर्तव्य आहे. समाजातील लहान मुलांपासून वृद्ध माणसांपर्यंत याची जाणीव करून दिली पाहिजे. तसा प्रयत्न येथे चितमपल्लींनी केलेला आहे. निसर्गाकडून आपण भरभरून मिळण्याची अपेक्षा करतो मग त्या निसर्ग संरक्षणची इच्छाही सर्वांनी बाळगली पाहिजे. परंतु मानव मात्र आपल्या गरजा भागवण्यासाठी या निसर्गाच्या घटकांना ओरबाडून त्याचे लचके तोडून खात आहे. यावरून आधुनिक काळात मानवाची हाव आणि स्वार्थीपणा वाढत चालला आहे याची जाणीव होते. हाच मानव जर निस्वार्थीपणे राहिला तर निसर्ग त्याला खूप काही न मागता स्वतःहून देईल तेव्हा यासाठी प्रथम वनांचे रक्षण केले पाहिजे वाढती जंगल तोड थांबली पाहिजे अन्यथा जंगले नष्ट होतील. जंगल वाचवण्याचा ध्यास चितमपल्ली या

लेखकाला लागला आहे असे त्यांच्या साहित्य वाचनातून जाणवते. निरंजन घाटे म्हणतात, "विषुववृत्तीय पर्जन्यारण्ये प्रचंड वेगाने तोडली जात आहेत त्यामुळे नवनवे सजीव आपल्याला ठाऊक होता होताच नामशेष होत आहेत. पेरींसारखे बरेच शास्त्रज्ञ पर्जनारण्य तोडीस विरोध करताहेत. पण वाढती लोकसंख्या आणि पैशाची हाव यामुळे पृथ्वीवरचा हा अनमोल ठेवा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे."[१६] निरंजन घाटे लोकसंख्येमुळे पैश्याच्या हव्यासासाठी मानव निसर्गाचा शत्रू बनत आहे. आज माणूस फक्त स्वतःपुरताच विचार करतोय 'आपलं भागलं जग बुडालं' या म्हणीप्रमाणे आपल्याला मिळतय ना ! दुसऱ्याला नाही मिळालं तरी चालेल या विचाराने ग्रासलेल्या मानवाला दुसऱ्याचंही दुःख कळायला पाहिजे कारण जंगल हे अनेक पशुपक्षी प्राणीमात्रांचे वसतिस्थान आहे. अनेक जीव या जंगलात राहत आहेत. वनातील झाडाझुडपात आपली घरटी करून ती राहतात. वनांच्या आजुबाजूला अनेक आदिवासी वनांच्या आधाराने जगत आहेत. वनांचाच जर नाश केला तर या जंगलातील पशुपक्ष्यांनी, प्राणीमात्रांनी जायचं कुठे? राहायचं कुठे? काय खायचं? कसं जगायचं? अनेक प्रश्न निर्माण होतील !

वन्य जीवांना वनांची अत्यंत आवश्यकता आहे. — शहरी मानवाला वनांचे महत्व जाणवत नाही. शहरी वातावरणामुळे वन्य जीवनाकडे त्यांचे फारसे लक्ष जात नाही परंतु वनांची आवश्यकता जाणवते ती वनात राहणाऱ्या वन्यजीवांना. चितमपल्लींनी याचे जवळून निरीक्षण केले आहे. वन्यजीवांच्या भावना, त्यांची जगण्यासाठी चाललेली धडपड त्यांनी पाहिली आहे त्यामुळे त्यांच्या सुखदुःखाची जाणीव चितमपल्लींना आहे कारण त्या अनुभवातून त्यांनी वनांचे, वृक्षांचे फायदे आपल्या निदर्शनास आणून दिले आहेत. दिवसभर चारा शोधत पोटासाठी अन्न शोधत भटकणारे वन्य जीव रात्र होताच आपआपल्या जागी स्थिर होतात. या वनराईत त्यांचे घर आहे. वन हेच त्यांचे जग आहे. माणूस जसा दिवसभराच्या कामाने कंटाळून सायंकाळी विसाव्यासाठी आपल्या घरी येतो. आपल्या मुलाबाळांमध्ये रमल्यानंतर त्याला दिवसभराच्या श्रमाचं सार्थक झाल्यासारखे वाटतं, वनात राहणाऱ्या या वन्य जीवांचेसुद्धा असंच आहे. झाडांच्या बुंध्यात किंवा झाडावरती, झाडाच्या आसपास हे वन्यजीव घरटी करून राहतात. आपण जर त्यांचं हे घरच मोडलं तर किती वन्य जीव अडचणीत येतील ? त्यांचं हे छोटसं जग जर आपण नष्ट केलं तर त्यांच जीवनच नष्ट

होईल याचा विचार करून आपण सर्वांनी मिळून जंगलाचे वनजीवांच्या या जगाचे संरक्षण केले पाहिजे.

पक्षी प्राणी आणि आदिवासींच्या जीवनाची काळजी – विश्वात जे आहे ते सारं निसर्गाचंच आहे असं मानणाऱ्या चितमपल्ली या विश्वप्रेमी लेखकाला पक्षी प्राणी आणि आदिवासी यांच्या जीवनाची काळजी वाटते. कारण वनांची नासधूस थांबली नाही तर त्यांच्या जीवनात अनेक संकटे येतील. हे चितमपल्लींना माहीत आहे. त्यामुळेच त्यांनी साहित्य निर्मिती करताना या सर्व बाबींचा मनःपूर्वक विचार करून लेखन केले आहे. वनराई ही पक्षी प्राण्यांमुळे शोभून दिसते. "पक्षांची शिकार हे पारध्यांचं उपजीविकेचं साधन आहे. त्यांच्या पर्यायी उपजीविकेच्या साधनांची सोय झाल्याशिवाय ही शिकार बंद होणार नाही. या कामी ग्रामपंचायती व गावकऱ्यांचं सहाय्य घ्यावं. पारधी तणमोर घेऊन येतात ते लोकांना विकतात. वनविभागाने ते ४-५ रूपये जास्तीचे देऊन विकत घ्यावे आणि ज्या जंगलातून ते आणले होते तेथे पक्ष्यांच्या पायात कडे घालून सोडून द्यावे. त्यामुळे त्यांचे प्राण वाचून पुढील संशोधनही करता येईल."[१७] तसेच शहरातील हॉटेलवालेही जेवणात भेसळ करतात. त्यासाठी तणमोराचा वापर करतात. याचा चितमपल्ली स्पष्ट उल्लेख करतात. "शहरातील हॉटेलवाल्यांना जाण दिली पाहिजे, प्रथम प्रेमाने व नंतर सामोपचारानं घ्यावं नंतरच कायद्याचा उपयोग करावा. तणमोर मारणं हा गुन्हा आहे. हे वृत्तपत्र, आकाशवाणी व टी. व्ही. वर त्या पक्ष्यांची रंगीत चित्रं दाखवून जनतेला त्याची माहिती द्यावी. मोर हा राष्ट्रीय पक्षी आहे. असा सतत प्रचार झाल्यामुळे आता मोराला उघड उघड कुणीच मारत नाहीत. मारल्यास गुन्हा होतो हे आता सामान्य माणसालाही माहिती झालं आहे."[१८] चितमपल्लीच्या या साहित्य लेखनाने समाजजागृती होते जंगलाच्या आजुबाजूला पाण्याची सोय असेल अशा जागेत आपल्या झोपड्या पालापाचोळ्यांची घरे करून विविध जमातींची अनेक आदिवासी माणसं राहत असतात. जंगलातील कंदमुळे, फळे खाऊन जंगलालाच आपले वसतिस्थान मानून राहतात. जंगलाचा आधार आणि वृक्षाची सावली या वातावरणात आदिवासी सुखावून जातात. आदिवासींच्या जगण्याचं एकमेव साधन म्हणजे ही 'जंगले' आहेत. या सर्व गोष्टीचा विचार करता, आधुनिक काळात वनांच रक्षण होणें गरजेचे आहे, याचे भान आता येऊ लागले आहे.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वनांची आवश्यकता – आधुनिक कालखंडात वनांच्या संरक्षणाची काळजी शासन घेत आहे, परंतु समाजातील व्यक्ती याचा गंभीरपणे विचार करत नाहीत त्यामुळे शासनाच्या योजना सगळीकडे पोहोचत नाहीत. याला जबाबदार शासन नाही तर समाजच आहे. तेव्हा ही जागृती प्रथम सामाजातच झाली पाहिजे समाजातील प्रत्येक मानवाला याची जाण आली पाहिजे.

पर्यावरण ही संकल्पना निसर्गाशी जवळीक साधणारी आहे. तर विकास ही संकल्पना मानवाशी संबंधित आहे. तेव्हा स्वतःचा विकास करताना अधिक चांगले राहणीमान मिळविण्यासाठी पर्यावरणातील घटक ओरबाडून घेतले जाणार नाहीत, पर्यावरणाची हानी होणार नाही याकडे समाजाने अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. चितमपल्ली म्हणतात, "पर्यावरणाचा समातोल बिघडत असताना तो वेळीच सावरला नाही तर आणखी अनपेक्षित अशा नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागेल. या भविष्यकालीन परिस्थितीचा कोणीच गंभीरपणे विचार करायला तयार नाही."[१९]

जगभर होणारा वनांचा ऱ्हास व उद्योगधंदे; वाहने यांच्या वाढीने निर्माण होणारा $Co_2$ यामुळे जागतिक तापमानात वाढ होत आहे. आज ग्लोबल वॉर्मिंगच्या तडाख्यामुळे उत्तर भारत होरपळून निघाला आहे. याची जाणीव समाजाला होऊ लागली आहे. "कीटकनाशके, रासायनिक खतांचा बेसुमार वापर हरितगृहे यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला. पावसाचे चक्र बदलले. ग्लोबल वॉर्मिंगमुळे येत्या वीस वर्षात समुद्राच्या पाण्याची पातळी वीस ते पंचवीस सेंटीमीटरने वाढेल आणि मुंबई जलमय होईल असा इशारा जागतिक पर्यावरण तज्ज्ञांनी दिला आहे."[२०] याचा सर्व जनतेने विचार करायला हवा. तापमान वाढत राहिल्यास ध्रूवावरील बर्फ वितळून ते पाणी महासागरात मिसळेल व त्यामुळे सागराच्या पाण्याची पातळी वाढेल. त्याचबरोबर पृथ्वीचा ७० टक्के भाग पाण्याने व्यापलेला आहे. तेव्हा पर्यावरणाच्या रक्षणासाठी आणि मानवाच्या अस्तित्वासाठी जलसंवर्धन अत्यंत महत्वाचे आहे. अन्यथा 'समुद्री चहुकडे पाणी, पिण्याला थेंबही नाही' अशी आपली अवस्था होईल.

चितमपल्ली म्हणतात, "निसर्गातील समतोल बिघडविण्यास माणूसच कारणीभूत ठरतो."[२१] लेखिका कुसुम कर्णिक म्हणतात, "१९६४सुमारास जंगलावर कंत्राटदाराची धाड पडून मोठ्या प्रमाणात इथे कोळसा झाला. कोळसा शहरांनी खाल्ला. पण जंगल म्हणजे आईचं छत्र स्थानिक लोकांनी गमावलं."[२२] कुसुम कर्णिक यांचे मत योग्य, वाटते. युरोपीय राष्ट्रांनी स्वतःच्या फायद्यासाठी जगभरातील पर्यावरणीय घटकांचा वापर केलेला आहे.

उच्च राहणीमान, पैशाचा हव्यास ही मानवाची वाढती हाव पाहून गांधीजींचे वचन आठवते. **There is enough for everyone's need but not for anyone's greed' - Mahatma Gandhi.** पृथ्वीकडे सर्वांची गरज भागविण्याइतकी साधनसंपत्ती आहे. परंतु एखाद्या व्यक्तीची हाव पुरी करण्यास मात्र ती अपुरी आहे.

आधुनिकतेच्या नावाखाली मानव वाटेल ते खातो आणि आजारांना आमंत्रण देतो. तेव्हा पर्यावरण सुसंवादी दिनचर्या असावी. आधुनिक काळानुसार विविध सणांमधील अनुचित प्रथा काढून टाकणे आवश्यक आहे. उदाः– होळीसाठी चांगली झाडे तोडली जातात. वटपौर्णिमेला वडाच्या मोठामोठ्या फांद्या तोडून शहरात आणल्या जातात. तेव्हा असे सण साजरे करताना पर्यावरणाचा प्राधान्याने विचार करण्यात यावा. वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने आम्लपर्जन्य, सुनामी, वादळे, भूकंप अशा घटना घडू लागतात. त्यामुळे मानवाची प्रचंड प्रमाणात हानी होते.

ही हानी थांबविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी याबद्दलची जाणीव जागृती समाजात मोठ्या प्रमाणात करण्याची आवश्यकता आहे. 'पर्यावरण शिक्षण हे केवळ पुस्तकी न राहता ते आपल्या आचरणाचा भाग व्हायला हवा. उद्याच्या उज्वल भवितव्यासाठी ते आजच करायला हवे. असेच चिंतनीय विचार चितमपल्लींच्या लेखनातून दिसून येतात. याशिवाय सोलापूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात एक निसर्ग मित्र म्हणून शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्येबाबत चितमपल्लींनी चिंता व्यक्त केली. शेतकऱ्याना योग्य मोबदला द्यावा असा ठाम विचार त्यांनी मांडला. डॉ. सुहास पुजारी म्हणतात. "चितमपल्लींनी निसर्ग आणि माणूस यांच्या नात्याचा शोध घेतला वन चिंतनातून तत्वचिंतन आपणासमोर ठेवले."[२३] चितमपल्लींच्या लेखनातून अत्यंत महत्वाचे

असे समाज प्रबोधन होते निसर्ग व मानव हातात हात घालून चालेल तरच जगाची प्रगती होईल विश्वाचे रक्षण होईल, विकास होईल.

आधुनिक कालखंडात वनाच्या रक्षणासाठी सामाजिक भान अत्यंत महत्वाचे आहे या संदर्भात समाजशास्त्रज्ञ, समाजसुधारक, राजकीय क्षेत्रातील नेते, पुढारी, पर्यावरणवादी संघटना व संस्था, लेखक, साहित्यिक, शिक्षण तज्ज्ञ यांनी मनपूर्वक कार्य केले तरच वनांचे संरक्षण होईल व 'जंगलाचं देणं वाचेल.'

आज शाळा, कॉलेजांमधून निसर्ग–पर्यावरण इ. विषय अभ्यासासाठी ठेवले असून त्यांच्या माध्यमातून मुलांना पर्यावरणाबद्दल सतर्क केले जात आहे. झाडे लावा झाडे जगवा, एक मूल, एक झाड, इ. घोषणांद्वारे समाज जागृती होत आहे. हा एक प्रगतीचा टप्पाच म्हणावा लागेल.

३. वन्य जीवनाचे चित्रमय शैलीतील वर्णन : (प्रतिमा, प्रतीके)

निसर्ग जीवनातील स्पंदने टिपताना चितमपल्लींची भाषा जशी काव्यमय बनते तशीच वृक्ष, प्राणी, पक्षी यांचे जीवन चित्रण करताना लेखकाची भाषा चित्रमय बनते कारण चित्रकला हा विषयच लेखकाच्या आवडीचा आहे. "चित्रकलेची मला आवड होती हायस्कूलमध्ये असताना चित्रकलेच्या एलेमेंट्री आणि इंटरमिजिएट अशा दोन परीक्षा दिल्या होत्या. एस. एस. सी . झाल्यावर मुंबईतल्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेवून चित्रकलेचा अभ्यास करावा अशी माझी इच्छा होती."[२४] इंटरमिजिएट परीक्षेत चितमपल्ली नापास झाले तरी पुन्हा परीक्षेला बसून पास झाले. परंतु परिस्थितीमुळे चितमपल्लींची ही इच्छा अपूर्णच राहिली साहित्यामध्ये चित्रमय अशी भाषा वापरून चितमपल्लींनी आपली ही अपूर्ण इच्छा पूर्ण करून घेतली आहे.

दुर्गा भागवत, व्यंकटेश माडगूळकर, श्रीनिवास कुलकर्णी यांनीही वृक्षचित्रणे केली, पक्षीचित्रणे केली, परंतु चितमपल्लींनी देशोदेशीच्या वृक्षांना पक्ष्यांना आपल्या चित्रमय

शैलीत उतरविले आहे. हे चित्रण करताना लेखकाने प्रत्येक पशू पक्षाला वृक्षाला प्राण्याला साजेशी अशीच प्रतिमा आणि प्रतिके वापरली आहेत. त्यामुळे हे वन्यजीव जसेच्या तसे आपल्या नजरेसमोर चितमपल्लींच्या साहित्याद्वारे उभे राहतात. हेच चितमपल्लींच्या चित्रमय लेखनशैलीचे कौशल्य आहे पण त्यासाठी प्रथम प्रतिमा आणि प्रतिके म्हणजे काय? याचा विचार करणे आवश्यक आहे.

लेखक रा. ग. जाधव म्हणतात, "ललित साहित्यातील प्रतिमा म्हणजे त्यातील अनुभवाची चित्रे, चित्राचा संबंध वाच्यार्थाने दृक संवेदनेशी म्हणजे डोळ्यांना साक्षात दिसणाऱ्या रूपाशी आणि लक्षणेने इतर सर्वच संवेदनाशी असतो. म्हणून प्रतिमा म्हणजे शब्दांच्या द्वारा काढलेली संवेदनात्मक अनुभूतींची चित्रे असा एक अर्थ"[२५] त्यानंतर रा. ग. जाधव म्हणतात, "प्रतीक याचा अर्थ चिन्ह, परंतु त्यापेक्षा ललित वाङ्मयातील प्रतिकांचे स्वरूप वेगळे असते. ललितेतर वाङ्मय व शास्त्रे आणि व्यवहार यामधील चिन्हे ही केवळ सोयीसाठी संमत केलेली असतात व त्याचा उपयोग एकाच अर्थाने कोणीही करू शकतो. एकाच अर्थाने ही चिन्हे कुण्या एका साहित्यिकाने निर्माण केलेली नसून संबंध समाजानेच निर्माण केलेली असतात. म्हणून ती अधिक सुलभपणे व यथार्थपणे समाजोपयोगी असतात."[२६] चितमपल्लींनी याच प्रतिमा आणि प्रतिकांचा वापर करून चित्रमय शैलीत लेखन केलं आहे. याबद्दल डॉ. सुहास पुजारी म्हणतात, "मराठी साहित्यसृष्टीत निसर्ग साहित्याचे नवनवीन धुमारे फुटत आहेत. निसर्ग जीवनाचे सम्यक दर्शन त्यातून घडते आहे. मराठी साहित्याला वनमित्र देणारे मारुती चितमपल्ली यांच्या ललित प्रतिभेचे हे देणे म्हणावे लागेल."[२७]

'जंगलाचं देणं' या पुस्तकामध्ये चितमपल्लींनी वन्यजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करुन प्रतिमांचा वापर केला आहे. उदा:– 'वृक्षावर इतकं शेवाळं की, वाटे त्यांना दाढ्या आल्यात.' (पृ. 3) हेच वाक्य चितमपल्ली वृक्षावर भरपूर शेवाळं होतं असही लिहू शकले असते परंतु त्याच वृक्षाला दाढ्या आल्यासारखं वाटतंय म्हटल्यावर वाचकांचेही लक्ष वाक्यांकडे केंद्रीत होतं. आणि त्या वृक्षाची प्रतिमाही हुबेहूब वाचकांच्या नजरेसमोर उभी राहते. त्यामुळे चितमपल्लींनी अशा प्रतिमांचा वापर लेखनात केला असल्याचे जाणवते.

त्यानंतर आणखी काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत. 'वृक्षाखाली कुठं बेताचं बेट, तर कुठं माड बुंध्याना पारवी आलेल्या. वाटायचं, वृक्ष उडावयाच्या तयारीत आहेत.'(पृ. ३) 'अनेक रंगाच्या काचेच्या कंगोऱ्याप्रमाणे खाडीचा पृष्ठभाग दिसत होता.' (पृ. ७), 'झाडांच्या मुळ्याची टोकं पाण्यावर आलेल्या एखाद्या तीक्ष्ण खिळ्यासारखी दिसतात. (पृ. ७), त्यानंतर पक्ष्यांच्या रंगरूपाचे त्यांच्या सौंदर्याचे, आवाजाचे चितमपल्लींनी केलेले वर्णन आणि दिलेली उपमा चितमपल्लींच्या चित्रमय लेखनशैलीचे दर्शन घडवितात. 'पक्षीगान' या लघुनिबंधात तर प्रतिमांचा उत्सवच पाहायला मिळतो उदाः– पाचूच्या पूजापात्रामधील मोत्याच्या शिंपल्याप्रमाणे शोभणारी कमळाच्या पानावरील बगळी, एखाद्या रूपवती नागकन्येप्रमाणे फूत्कार टाकणारे सुंदर पंखाचे हुदहुद, उंच पर्वतातील पठारावरील गवताच्या निळ्या फुलांच्या मखमली गालिच्यांवरून हारीने चालणाऱ्या रूपवती शामल कोकणी लावा, काळ्या पांढऱ्या जुन्या पद्धतीच्या पोशाखातील करकोचे , अशी वर्णने चितमपल्लींनी चित्रमय शैलीत लिहिली आहेत. डॉ. सुहास पुजारी म्हणतात, "वृक्षांना गायला लावण्याची किमया जशी चितमपल्ली यांच्या लेखणीने साधली आहे. त्याप्रमाणे पक्ष्यांच्या अपार्थिव सौंदर्याला शब्दांच्या चिमटीत पकडण्याची प्रतिभाही दाखविली"[२८]

प्रतिमांच्या माध्यमातून चितमपल्लींनी वन्यजीवनाचे दर्शन घडविले. वन्यजीवनाचे निरीक्षण करताना चितमपल्लींना काही वेगळे अनुभवही आले. उदाः– जंगलात अंधारात जेव्हा एखादी आदिवासी स्त्री मोहाची फुले गोळा करायला जाते त्यावेळी खाऊन खाऊन गुंगी येऊन एखादे अस्वल तिथं झोपलेलं असतं परंतु त्या आदिवासी स्त्रिला ते अस्वल म्हणजे आपली सवतच वाटते आणि ती तिला उद्देशून म्हणते, 'अगं माझ्या झाडाची फुलं गोळा करतेस का? आता तुला दाखवतेच.' (पृ. ९). चिंचेच्या झाडाचे सुंदर चित्रण लेखकाने केले आहे, ते असे वृक्षांना कोवळी पालवी फुटू लागली की वाटतं, 'वैदुर्य मण्याचे घुमट गावात उभे आहेत. नंतर त्याचा वर्ण हिरव्या रत्नासारखा दिसू लागतो. ग्रहनक्षत्रांनी निळं आभाळ जसं शोभावे तसं पांढऱ्या–बदामी–काळ्या पक्ष्यांनी हे वैदुर्य मण्यांचे घुमट शोभू लागते.' (पृ. १३) सारंगागारे ही लेखकांना नवेगाव राष्ट्रीय उद्यानातील जांभडी व पवनी या नवेगाव तळ्याकाठच्या गावात आढळून आली. जांभडी येथील सारंगागार नवेगान राष्ट्रीय उद्यानाचे भूषण आहे, तर त्या गावच्या समृद्धीचे प्रतीक आहे. (पृ. १३) पक्षी हे झाडावरच राहतात. चिंचेच्या झाडावरील आनंदी पक्षी पाहून लेखक म्हणतात, या आनंददायी पक्ष्यांनी

तर त्या वृक्षाची तशीच गावची समृद्धी द्विगुणित केली आहे..'(पृ. १७), 'चिंचेच्या. रूपाने जणू आरोग्य नांदते आहे. तो नित्य औषधी देणारा वैद्यच वाटतो.'(पृ १६)

चीन देशातील वेस्ट लेख परगण्यातील दहा प्रेक्षणीय स्थळापैकी एकाला – **Listening to orile among the wilow waves** म्हणतात. डॉ. सुहास पुजारी चितमपल्लींच्या या लेखनाबद्दल लिहितात, "नानाविध निसर्ग घटकातील साहचर्यातून सिद्ध होणाऱ्या प्रतिमा हा एक चितमपल्लीं यांच्या निसर्गलेखनाचा महनीय व चमकदार पैलू म्हणावा लागेल. अशा लेखनकलेचा परिसस्पर्शच त्यांच्या निसर्गानुभवांना झाला असल्याने ते अधिक झळाळते."[२१]

चितमपल्लींच्या 'जंगलाचं देणं' या पुस्तकामध्ये काही अलंकारही आलेले दिसतात. भाषा अधिक सुंदर अधिक आकर्षक व परिणामकारक होण्यासाठी लेखक कवी भाषेला अलंकारांनी सजवितात. ज्या ज्या गुणांमुळे भाषेला शोभा येते त्या त्या गुणधर्मांना 'भाषेचे अलंकार म्हणतात.' चितमपल्लींनी अगदी सहज लेखन केले आहे. भाषेचे व्याकरण चालवायचे म्हणून लिहीत नाहीत तर आलेले अनुभव आपल्या लेखणातून सहजपणे प्रकट केलेत. परंतु एक लेखक म्हणून त्यांच्या लेखनात असे वाङ्मयीन गुण आढळतात. उदा:– 'पळसाची लाल नारंगी फुलं पोपटाच्या चोचीसारखी दिसतात.' (पृ. १९), 'मोहाच्या फुलांचा रंग हरिणीच्या पोटरीच्या वर्णासारखा फिकट पिवळा दिसतो.' (पृ.. २६) 'आकाश जसे इंद्रधनुष्याच्या रंगाने शोभते तसेच वनश्री पक्षीरूपी इंद्रजालाचे गूढ वाटते.(पृ. ४२) अशी उपमा, दृष्टांत, अलंकाराची उदाहरणे लेखनात येतात. त्यानंतर 'पाण्याचा रंग एखाद्या गुलजार पारव्याच्या पंखासारखा बहुरंगी वाटत होता.', चिंचेच्या फळांचा रंगदेखील खजुरासारखाच.' अशी रूपक अलंकाराची उदाहरणे आहेत. तसेच 'वृक्षासारखा धर्मात्मा कुणी नाही.' या वाक्यामध्ये अनन्वय अलंकार जाणवतो. अशीच अलंकाराची वाक्ये चितमपल्लींच्या लेखनात आढळतात.

पाणपिपुलीच्या डोक्यावर असणाऱ्या दोन पांढऱ्या रेघा नागिणीच्या फणीवरील आकडयासारख्या वाटतात. गुप्तधनावर नागीण जशी जीभ आत बाहेर करत बसलेली असते त्याप्रमाणे पाणपिपुलीला नागिणीची उपमा दिली आहे. त्यामुळे या वाक्यात उपमा अलंकार

येतो शिवाय एखादे चित्र पाहावे तसे पाणपिपुलीचे चित्र आपल्या नजरेसमार येते. चितमपल्लींच्या लेखनात अशा प्रतिमा येतात. परंतु कुठेही प्रतिमांचा अतिरेक झालेला दिसत नाही. निसर्ग अनुभवातून बहरलेल्या प्रतिमा हा चितमपल्लींच्या भाषाशैलीचा एक मनोज्ञ विशेष आहे. त्यामुळेच त्यांचे लेखन उच्च दर्जाचे झाले आहे. वेगवेगळ्या कल्पना, म्हणी, संदर्भ यामुळे लेखनास सौष्ठव प्राप्त झाले आहे.

## ४. मानव वन्य प्राणी आणि निसर्गाचा अद्भूत मिलाप :–

आज कितीतरी माणसे वन्यप्राण्याची शिकार करून त्यांच्या जातीच नष्ट करत आहेत. पण लेखकांनी आपल्याला दाखवून दिले आहे की, या प्राण्यांनासुद्धा माणसांप्रमाणेच भावभावना आहेत. त्यांचीही सुखदुःखे आपल्यासारखीच आहेत. मानव जसा निसर्गाच्या कुशीत जन्माला येतो. निसर्गाच्याच सानिध्यात वावरत असतो. तसेच वन्यप्राणीही निसर्गाच्याच आधाराने जगत असतात. आपल्याला जशी निसर्गाची नितांत गरज आहे. तशीच निसर्गालाही आपल्या प्रेमाची, आपुलकीची, मायेची गरज आहे. निसर्गाला आपल्याकडून फक्त आपलेपणाची अपेक्षा आहे. आपण जर निसर्गाला आपल्यातलाच एक आहे असे समजून राहिलो तर तो आपले ऐश्वर्य सढळ हाताने आपल्याला भरभरून देईल. पण सर्वसामान्य माणसांना याची जाणीव होत नाही. ही माणसं निसर्गाच्या जवळ येण्याऐवजी निसर्गापासून दूरावत चालली आहेत. अशा परिस्थितीत मानव, वन्यप्राणी आणि निसर्गाला एकत्रित आणून त्यांचे एकमेकांशी असलेले नाते पटवून देण्याचे मोलाचे कार्य चितमपल्लींनी केले आहे. त्यामुळे आपण या लेखकाचे आभारच मानले पाहिजेत.

दुर्गा भागवत म्हणतात, "झाडांना चालता येत नाही पण जागच्या जागी हालता येते झाडे वेळोवेळी आनंदाचे नि दुःखाचे चित्कार करतात. ते आपण क्वचितच ओळखतो."[३०] दुर्गाबाईचे हे मत यथायोग्य आहे. आपल्याला सहजासहजी झाडांच्या दुःखाचे चित्कार ओळखता येत नाहीत, परंतु हे झाडांचे दुःख ओळखले ते चितमपल्लींनी, त्यांच्या या दुःखचा चित्कार चितमपल्लींच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचला. त्यामुळे त्यांनी मानवासारखेच निसर्गजीवन रेखाटले. भ. श्री. पंडीत म्हणतात, "निसर्ग हे परमेश्वराचे

मूर्तिमंत काव्य आहे. निसर्गात त्याचा अधिवास आहे. तो फुलांच्या मिषाने हसतो, वायूच्या मिषाने कुरवाळतो आणि वर्षावाच्या मिषाने अमृताचे सिंचन करतो."[३१] याचा अर्थ चितमपल्लींप्रमाणे इतरही लेखक–कवींनी निसर्गाला सजीव समजले आहे. परंतु चितमपल्लींनी निसर्गाशी नाते जोडले आणि त्याला आपल्याशी बोलायला भाग पाडले. मुक्या जीवांना शब्दकळा फोडण्याचे आणि त्यांचे भाव आपल्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य चितमपल्लींनी केले. चितमपल्ली म्हणतात, "मी वनाधिकारी म्हणून वनात प्रवेश केला हा वनवास मला कधीही विजनवासासारखा वाटला नाही. आदिवासी वृक्षांना माणूसच समजतात फरक एवढाच की, झाडांना चालता येत नाही."[३२] मानवाप्रमाणेच निसर्गालाही रूप असते, रंग असतो, गंध असतो, त्यालाही स्वतःचे दुःख असते. निसर्ग बोलतो, रूसतो, हसतो त्याच्याही बाल, तारूण्य आणि वृद्धावस्था अशा तीन अवस्था असतात. निसर्ग जागा होतो, झोपतो, विश्रांती घेतो, याचे भान चितमपल्लींच्या लेखनातून निर्माण होते.

दुर्गा भागवत यांच्या मते, "नवे विज्ञानदेखील झाडांना संवेदना व भावना असतात आणि त्या विविध तऱ्हेने व्यक्त होतात. असे सांगू लागले आहे. उदा.– मालक मेला की झाडे मेल्याची उदाहरणे कमी नाहीत."[३३] चितमपल्लींनी तर या झाडांचे बारकाव्याने निरीक्षण करुन आणि अभ्यासपूर्ण माहिती मिळवून उल्लेख केला आहे. झाडं म्हणजे पशु पक्षी आणि माणसांचा स्थिर निवारा. बाहूसारख्या पसरलेल्या फांद्या सर्व प्राणीमात्रांना जवळ बोलावीत असतात. झाडांना चालता येत नाही म्हणून जीवनच त्यांच्याकडं जातं.

'पाखरं आणि झाडं म्हणजे एक जिवंत शिल्प आहे,' त्यांच्यात कधीही न तुटणारं नातं आहे कारण ती जशी धरणीमातेची आहेत तशीच ती आभाळाची आहेत. वृक्षाकडं झेप घेणारी पाखरं, वृक्षापसून दूर जाणारी पाखरं, शांत वृक्षात गाणारी पाखरं हे सारे क्षण म्हणजे निसर्गातील पवित्र काव्य आहे. वृक्षांच्या जीवनाबद्दल अत्यंत सुंदर असा उल्लेख चितमपल्लींच्या लेखनात आला आहे. इथे चितमपल्लींनी निसर्ग, मानव, पशु, पक्षी आणि प्राणी या सर्वांचे एकमेकांशी असलेले नाते पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. सुहास पुजारी यांच्या मते, चितमपल्लींच्या निसर्ग चित्रणात समग्रता आढळते. सबंध सृष्टीकडे एक प्राणमय जीव म्हणून पाहण्याची दृष्टी त्यामागे आहे."[३४]

चितमपल्लींनी निसर्गाच्या प्रत्येक घटकाचे सजीव . असे चित्रण केले आहे उदाः— 'गावचे वाऱ्यावादळापासून रक्षण करण्याचे कार्य चिंचेचे झाड करते. गावचा 'रक्षणकर्ता म्हणून चिंचेची झाडे गावात उभी असतात. प्रत्येक जीवाला जगण्यासाठी निसर्गाचा आधार घ्यावा लागतो. जपान्यांनी निसर्गाचे वातावरण जीवनात आणले आहे. चेरीच्या मोहोराला तर जपान्यांनी जागतिक महात्म्य मिळवून दिले. प्राकृत व संस्कृत अशा प्राचीन वाङ्मयातील वसंतोत्सवाचे चितमपल्लींनी दिलेले संदर्भ वाचून प्राचीन जीवनातल्या निसर्गप्रेमाची ओळख आपणाला होते. वृक्षांना आपल्या जीवनात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. परंतु दुर्दैवाने याकडे आपणा सर्वांचे दुर्लक्ष होत आहे ही चिंतेची बाब आहे. चितमपल्लींनी मात्र याचा मनापसून विचार केला आहे. त्यांनी निंसर्गातील चंद्र, सूर्य, तारे, नक्षत्र, आकाश, डोंगर, जलाशये, पशुपक्षी यांचेही मानवीकरण इथे केले आहे. आई जशी कोणत्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता आपल्या मुलांचा संभाळ करते त्याप्रमाणे जलाशये कोणतीही अपेक्षा न ठेवता प्राणीमात्रांची मानवाची सर्वांची तहान भागवत असतात. सूर्य अखंडपणे प्रकाश दानाचे कार्य करीत असतो, चंद्र तारका यांना स्वतःचं स्वतंत्र व्यक्तित्त्व असते. चितमपल्लींनी इथे निसर्गाला व्यक्तित्त्व बहाल केल्याने इथला पाऊस मग गाऊ लागतो. नाचू लागतो, कधी कधी असे होतं की हे त्यांचं नाचणं थोडं जास्त होतं आणि त्या नाचण्याचं तांडवनृत्यात रूपांतर होते, त्यामुळं झाडं वेली घाबरून जातात. म्हणजेच जोराचा पाऊस बरसतो, पाऊस आपल्या सखीला भेटायला आलेल्या प्रियकरासारखा येतो. अन् धरतीवर उत्कटतेने बरसतो. तिला न्हाऊ घालतो... या त्यांच्या नाजुक सहवासाचा सुगंध दरवळतो. चितमपल्लींच्या अशा वर्णनामुळे आपल्याला पावसाची कविता आठवते. "माऊलीच्या दुग्धापरी आले मृगाचे तुषार, भुकेजल्या तान्ह्यासम तोंड पसरी शिवार. "

जोराचा पाऊस पडल्यानंतर मातीचा सुगंध आपल्याही मनात उतरतो. अनेकांना मग या मातीचा आस्वाद घेण्याचा मोह आवरत नाही, आम्रवृक्ष नेहमीच एखाद्या दैवतासमान भासतो. मोहाचं झाड एखाद्या प्रमत्त सुंदरीसारखं वागतं. लिंबोणीचं झाड वैद्याच रूप धारण करून सर्वांच्या आरोग्याची काळजी घेतं. ही सारीच झाडं एखाद्या कर्त्या पुरुषासारखं ऊन स्वतःच्र डोक्यावर घेतात अन् जवळ येणाऱ्याला सावली देतात. औदुंबर, वड, पिंपळ यांची आजही या वृक्षांची पूजा करण्यात येते त्यामागे हेच कारण आहे. या वृक्षांना दैवत मानून आपल्याकडे त्यांची पूजा करण्यात येते 'काही वृक्ष म्हणजे शापीत माणसंच असावीत' केवळ

नारळाचेच झाड नव्हे तर प्रत्येक वृक्ष हा तसा कल्पवृक्षच आहे. याची जाणीव इथें होते. त्याच्या प्रत्येक भागाचा मानवाला उपयोग होतो. जांभळाची सावली आईसारखी प्रेमळ असते तर लिंबोणीची सावली ही आधार देण्याऱ्या गुरुसारखी असते. लिंबोणीच्या वृक्षाकडे बघत बघत अंगाई गीत ऐकत लहान मुलांना झोप लागते. कदाचित तो वृक्षच लहान मुलांना सुलावून झोपवित असेल? मूळ उत्पत्ति चीनमध्ये असणाऱ्या विलो वृक्षालाही असे मानवी रूप दिले आहे. चिनी युवतीसारखे दिसणारे त्यांचं नाजूक रूप मनाला भुरळ घालते. 'फुललेला मोहा' स्वतः तर आनंदी असतोच पण आपल्या या आनंदामध्ये शेकडो आदिवासी स्त्री, पुरुष, वन्यप्राणी पक्षी अशा वन्यजीवांना सामील करून घेतो. आदिवासींच्या पिढयान्पिढया वृक्षांच्या सहवासात लहानाच्या मोठ्या होतात.

मानव जशा आकर्षक इमारती बांधतो तसेच प्राणी पक्षी सुंदर अशी कलाकुसरतेने घरटी बांधतात या घरट्यात आपल्या पिलांना ठेवून त्यांच्यासाठी चारा शोधायला जातात. आईवडील बाहेर गेल्यानंतर लहाल मुले जशी आपल्या मातापित्याची वाट पाहत असतात. तशीच या पक्ष्यांची पिलेसुद्धा आपल्या मातापित्याची वाट पाहतात. पक्षिणी आपल्या पिलांना चारा भरवते, त्यांना चालायला, अन्न शोधायला शिकवते. त्यांना संकटाची जाणीव करून देतात. मानवाप्रमाणे प्राणीसुद्धा आपल्या स्वतःच्या शरीराची निगा ठेवतात.

निसर्ग आणि मानवाप्रमाणेच पशुपक्षी, सूक्ष्मजीव, प्राणीमात्रांनाही भावभावना असतात. मानव हा प्राणी बोलू शकतो. ~~पशुपक्षी एकमेकांशी संवाद साधत असतात.~~ या त्यांच्या आवाजाकडे आपले फारसे लक्ष नसते परंतु चितमपल्लींनी मात्र या मुक्या प्राण्यांच्याही आवाजाचे निरीक्षण केले. तेव्हा चितमपल्लींच्या साहित्यातील प्राणी, पक्षी हे मुके न राहता बोलके झाले आहेत. त्या अबोल जीवांना शब्दकळा फोडण्याचे कार्य चितमपल्लींनी केले आहे. त्यांच्या आवाजाची विस्ताराने नोंद घेतली त्यांचा हा मधुर आवाज म्हणजे त्यांची भाषाच आहे. लेखकाच्याच शब्दात सांगायचे तर, 'देवाने जरी माणसांना आवाजाची देणगी दिली असली तरी पक्ष्यांनाही मधुर असा कंठ दिलेला आहे, सप्तसुरांचे प्रकटीकरण सातत्याने होत असते. त्या आवाजातून पक्ष्यांचे प्रेम, माया, जिव्हाळा, राग, द्वेष या भावना प्रकट होत असतात.

चितमपल्ली म्हणतात, "प्रेमभावना कोणालाही शिकवावी लागत नाही, ती प्राणीमात्रात उपजतच असते."[३७] असाच एक कावळीच्या जीवनातील प्रसंग चितमपल्लींनी चित्रित केला आहे. 'एक कावळा दुसऱ्या कावळीच्या चोचीजवळ चोच नेऊन काहीतरी कुजबूज करत होता. आपल प्रेम व्यक्त करत होता. त्यातून त्यांचं मिलन होतं आणि ती कावळी अंडी घालण्याकरिता दूर निघून जाते' असे पक्ष्यांच्या जीवनातही नाजूक भावप्रसंग असतात. असे क्षण पक्ष्यांना सुखावून जातात. हे चितमपल्लींनी दाखवून दिलं आहे. चितमपल्लींच्या अशा लेखनाने 'जंगलाचं देणं' या पुस्तकामध्ये मानव, वन्यप्राणी आणि निसर्गाचा अद्भूत मिलाप घडून आला आहे.

# संदर्भ सूची

१. आळतेकर मनोहर माधव, मराठी निबंध, प्रथमावृत्ती, संविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६३, पृ. २३.

२. खांडेकर वि. स., हिरवळ, तिसरी आवृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००१, पृ. ९.

३. हातकणंगलेकर म. द, साहित्यविवेक, प्रथमावृत्ती, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. १८०.

४. गोरे दादा, साहित्य समीक्षा आणि आस्वाद, प्रथमावृत्ती, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. ६२.

५. चितमपल्ली मारुती, चकवा चांदण:(एक वनोपनिषद), प्रथमावृत्ती, मौज प्रकाशन मुंबई, २००५, पृ. ९४.

६. चितमपल्ली मारुती, सुवर्णगरूड, द्वितीयावृत्ती, नवचैतन्य प्रकाशन मुंबई, २००३, पृ. अभिप्राय

७. मुलाखत, दिनांक ११/१२/२००६.

८. उनि, चकवा चांदण: (एक वनोपनिषद), पृ. ५०३.

९. चितमपल्ली मारुती, शब्दाचं धनं, तिसरी आवृत्ती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २००५, पृ. २४.

१०. पुजारी सुहास, रानावनातला माणूस, प्रथमावृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे १९९७, पृ. ४५.

११. डॉ. खांडगे मंदा, पाटील तानाजी, माहिते शिवाजीराव (संपा) ललितरंग पृ प्रस्तावना.

१२. उनि, सुवर्णगरूड, पृ. दुसरी आवृत्ती प्रस्तावना.

१३. उनि, ललितरंग पृ. २२.

१४. तत्रैव, पृ. ३९.

१५. बर्दापूरकर प्रवीण, लोकमत वृत्त विशेष, दि. २८ जानेवारी २००६.

१६. घाटे निरंजन, निसर्गयात्रा, प्रथमावृत्ती, मधुराज पब्लिकेशन्स, पुणे २००१,

१७. चितमपल्ली मारुती, रानवाटा, प्रथमावृत्ती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १९९१, पृ. ४९.

१८. तत्रैव, पृ. ४८.

१९. तत्रैव, पृ. ७३.

२०. संपादकीय दैनिक ऐक्य, सातारा, मंगळवार दि. १२ जून २००७ पृ. ४

२१. चितमपल्ली मारुती, निसर्गवाचन, नवीन सुधारीत आवृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५, पृ. ७१.

२२. कर्णिक कुसुम, संपादकीय, सकाळ, मंगळवार दि. ५ जून २००७ पृ. ६.

२३. उनि, रानावनातला माणूस, पृ. ४८.

२४. उनि, चकवा चांदण: (एक वनोपनिषद), पृ. ११२.

२५. जाधव रा. ग, वाङ्मयीन निबंधलेखन, स्वरूप आणि साधने, प्रथमावृत्ती, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९६७, पृ. ९४.

२६. तत्रैव, पृ. ९९.

२७. उनि,रानावनातला माणूस, पृ. ३०.

२८. तत्रैव पृ. ३६.

२९. तत्रैव पृ.

३०. भागवत दुर्गा, निसर्गोत्सव, प्रथमावृती, दिलीप प्रकाशन, मुंबई, १९९६, पृ. ८७.

३१. पंडीत भ. श्री, (संपा) समग्र केशवसुत, चौथी आवृत्ती, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९९६ पृ. ८३

३२. तत्रैव, पृ. १००.

३३. उनि, निसर्गोत्सव, पृ. १२५.

३४. उनि, रानावनातला माणूस, पृ. ३३.

३५. उनि, निसर्गवाचन, पृ. २३.